स्थापना : दि. ५ मे २००८
नों.क्र.महा./२४१२१/को./११/०७/०८


शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर
विद्वत्प्रमाणित, यु.जी.सी. मान्यताप्राप्त त्रैमासिक
(Peer Reviewed Referred Research Journal )
ISSN No. 2319-6025

# शिविम संशोधन पत्रिका

वर्ष–आठवे : अंक सतरा–अठरा । जानेवारी ते जून २०१९

## श्रमसंस्कृती आणि साहित्य

दिनांक ९ आणि १० फेब्रुवारी, २०१९



कुणी न राहो दुर्बल अज्ञ । म्हणुनी हा शिक्षण यज्ञ ।।
माजी आमदार श्री. बाबासाहेब पाटील सरुडकर शिक्षण संस्थेचे

**श्री शिव-शाहू महाविद्यालय, सरूड**

ता. शाहूवाडी, जि. कोल्हापूर
नॅक तृतीय मूल्यांकन : B ग्रेड (CGPA- 2.41)

Scanned by CamScanner

डॉ. सुभाष जाधव.
इचलकरंजी

शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघाचे विद्वत्प्रमाणित त्रैमासिक

# शिविम संशोधन पत्रिका

(Peer Reviewed Referred Research Journal )

ISSN No. 2319-6025

(विद्यापीठ अनुदान आयोग नवी दिल्ली, मान्यता अ. क्र. ६४१७५)

**वर्ष-आठवे : अंक सतरा-अठरा**

जानेवारी-फेब्रुवारी-मार्च, एप्रिल-मे-जून २०१९

## श्रमसंस्कृती आणि साहित्य

संपादक

**डॉ. शिवकुमार सोनाळकर**

कार्यकारी संपादक

**डॉ. नीला जोशी**

संपादक मंडळ

**डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. गोमटेश्वर पाटील, डॉ. तातोबा बदामे, डॉ. दिनेश वाघुंबरे**

संपादन सहाय्य

**प्रा. प्रकाश नाईक, प्रा. रघुनाथ मुडळे**

सल्लागार समिती

**डॉ. राजन गवस, डॉ. प्रकाश कुंभार, डॉ. डी. ए. देसाई, डॉ. अनिल गवळी**

**प्रकाशक**

अध्यक्ष, शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर

अनुराज, ७/ब, सूर्यवंशी कॉलनी, सानेगुरुजी वसाहत, कोल्हापूर ४१६ ०११

**मुद्रक**

भारती मुद्रणालय

८३२ ई वॉर्ड, शाहूपुरी ४ थी गल्ली, कोल्हापूर. फोन : (०२३१) २६५४३२९

मूल्य : रु. ३००/-



Scanned by CamScanner

# अंतरंग


| | | |
|---|---|---|
| अध्यक्षीय मनोगत... | डॉ. शिवाजी विष्णू पाटील | ८ |
| श्रमसंस्कृती, साहित्य आणि बांधिलकी | डॉ. अनिल गवळी | १३ |
| ग्रामीण कष्टकरी स्त्रीचे चित्रण | एकनाथ पाटील | १८ |
| श्रमसंस्कृती आणि गोमंतकीय मराठी साहित्य | डॉ. विद्या प्रभुदेसाई | २७ |
| श्रमसंस्कृती आणि कोकणी साहित्य | डॉ. महेश स. बावधनकर | ३३ |
| सीमाभागातील श्रमसंस्कृती आणि साहित्य | डॉ.शिवाजीराव पाटील | ४२ |
| श्रमसंस्कृती आणि ग्रामीण साहित्य | डॉ. यशवंत चव्हाण | ४८ |
| श्रमसंस्कृती आणि भटक्याविमुक्तांचे साहित्य | डॉ. बाळासाहेब संतू चव्हाण | ५३ |
| श्रमसंस्कृती आणि स्त्रीवादी साहित्य | डॉ. लता पांडुरंग मोरे | ६६ |
| श्रमसंस्कृती आणि दलित साहित्य | डॉ. चंद्रकांत शंकर कांबळे | ७० |
| श्रमसंस्कृती आणि आदिवासी साहित्य | प्रा. डॉ. दीपककुमार वळवी | ७७ |
| श्रमसंस्कृती आणि ग्रामीण कष्टकरी स्त्री | डॉ.मानसी जगदाळे | ८१ |
| श्रमसंस्कृती आणि महानगरीय कविता | तेजस चव्हाण | ८७ |
| मधउत्पादक श्रमजीवी | श्री. दत्ता मोरसे | ९३ |
| भारतीय श्रमसंस्कृती आणि मराठी श्रमगीत परंपरा | प्रा. अनंता कस्तुरे | ९७ |
| नोकरी, व्यवसाय, करिअर करणारी स्त्री | प्रा. डॉ. शिवकुमार सोनाळकर | १०७ |
| महादेव मोरे : श्रमिक साहित्याचा आधारस्तंभ | प्रा. डॉ. रमेश पोळ | ११२ |
| खोत व दौंड यांच्या कादंबरीतील शेतकरी | डॉ. एकनाथ आळवेकर | ११६ |
| महादेव मोरेंच्या साहित्यातील विडी कामगार | प्रा. डॉ. संजय दशरथ पाटील | १२० |
| मराठी स्त्रीगीते आणि श्रमसंस्कृती | डॉ. नीला जोशी | १२३ |
| 'कुळंबीण' : शेतकरी स्त्रीच्या श्रमाचे चित्रण | डॉ. आनंद वारके | १२७ |
| जागतिकीकरण आणि मराठी कादंबरीतील श्रमिक | डॉ. प्रकाश दुकळे | १३० |
| महात्मा बसवण्णांचा श्रमसिद्धांत : 'कायकवे कैलासा' | डॉ. मांतेश हिरेमठ | १३३ |
| मराठी नाटकातील श्रमजीवींचे चित्रण | प्रा. डॉ. दत्ता पाटील | १३७ |
| म. फुले यांच्या साहित्यामधील श्रमिकांचे चित्रण | डॉ. अरुण शिंदे | १४३ |
| नारायण सुर्वे यांच्या कवितेतील कामगारविषयक जाणिवा | डॉ. शिवलिंग मेनकुदळे | १४६ |
| नारायण सुर्वेंच्या कवितेतील कामगार | प्रा. डॉ. शिवाजी महादेव होडगे | १५१ |




Scanned by CamScanner

| | | |
|---|---|---|
| श्रमसंस्कृती आणि ग्रामीण कविता | डॉ.अशोक सदाशिव तवर | १५३ |
| शेतकऱ्यांचे लढे आणि ग्रामीण कादंबरी | प्रा. डॉ. सौ. कांचन नलावडे | १६० |
| अनिल अवचट यांच्या साहित्यातील श्रमजीवन | डॉ. सुरेश बाळकृष्ण शिंदे | १६६ |
| धनगर समाजातील श्रमसंस्कृती | डॉ. तानाजी ज्ञानदेव पाटील | १७० |
| 'आम्ही काबाडाचे धनी'तील कष्टकरी | प्रा. सुभाष वाघमारे | १७३ |
| श्रमसंस्कृती आणि बहिणाईंची गाणी | डॉ. सुवर्णा नामदेव पाटील | १७७ |
| कामगार रंगभूमीवरील श्रमिक | डॉ. आनंद शामराव बल्लाळ | १८१ |
| तथागत बुद्ध आणि श्रमसंस्कृती | डॉ. प्रशांत बाबासो गायकवाड | १८५ |
| सुर्वेंची कविता : श्रमिक जीवनाचा दस्तऐवज | डॉ. अशोक शेलार | १९० |
| दलितांच्या श्रमाचे चित्रण | प्रा. डॉ. नितीश पांडुरंग सावंत | १९३ |
| ग्रामसंस्कृती आणि श्रमसंस्कृती : सहसंबंध | प्रा. डी. जे. दमामे | १९६ |
| जनाबाईंचे अभंग आणि श्रमसंस्कृती | डॉ. धनंजय होनमाने | १९९ |
| मराठी कवितेतील शेतकरी व शेतमजुरांची श्रमसंस्कृती | डॉ. भरत जाधव | २०२ |
| श्रमिक साहित्य आणि साम्यवाद | डॉ. हणमंत रामचंद्र पोळ | २०५ |
| अवैदिकांची श्रमसंस्कृती आणि श्रमप्रतिष्ठा | डॉ. महेश गायकवाड | २०८ |
| अण्णा भाऊ साठे यांच्या कादंबरीतील श्रमसंस्कृती | डॉ. सविता अशोक व्हटकर | २११ |
| आदिवासी कादंबरीतील भिल्ल जमातीचे श्रमचित्रण | प्रा. विनायक राऊत | २१४ |
| इंद्रजित भालेरावांच्या कवितेतील शेतकरी, शेतमजूर | प्रा.डॉ. सुजय बाबूराव पाटील | २१७ |
| भास्कर चंदनशिव यांच्या साहित्यातील श्रमसंस्कृती | प्रा. राजश्री बिसुरे | २२० |
| महादेव मोरे यांच्या कादंबरीतील श्रमिकांचे चित्रण | डॉ.विनोद राठोड | २२३ |
| नारायण सुर्वे : कामगार साहित्याची 'सनद' | सौ. शीतल सचिन गोर्डे-पाटील | २२६ |
| नारायण सुर्वेंच्या कवितेतील श्रमिकांचा जीवनसंघर्ष | डॉ. अशोक नामदेव शिंदे | २२९ |
| धम्मपाल रत्नाकरांच्या साहित्यातील हॉटेल कामगारांचे चित्रण | डॉ. सर्जेराव पद्माकर | २३२ |
| मराठी कथेतील ग्रामीण, कष्टकरी स्त्रीचे चित्रण | प्रा. संतोषकुमार डफळापूरकर | २३५ |
| 'कविता श्रमाची' मधील श्रमजीवी | प्रा. विठ्ठल नामदेव रोटे | २३८ |
| तू वेडा कुंभार आणि बलुतेदारांची श्रमसंस्कृती | डॉ. सुभाष गणपती जाधव | २४१ |
| आदिवासी साहित्यातील श्रमचित्रण | प्रा. सुलोचना रमेश दंतराव | २४४ |
| १९८० नंतरच्या कादंबरीतील श्रमिकांचे चित्रण | डॉ. माधव मारुती भोसले | २४७ |
| आदिवासींच्या कादंबरीतील श्रमिक | प्रा. भीमराव खंडू वानोळे | २५० |
| 'राघववेळ' व 'अघोरी' कादंबरीतील श्रमसंस्कृती | प्रा. डॉ. आर. डी. कांबळे | २५३ |



ISSN No. 2319-6025

Scanned by CamScanner

# तू वेडा कुंभार आणि बलुतेदारांची श्रमसंस्कृती

**डॉ. सुभाष गणपती जाधव**

श्रीमती आ.रा.पाटील कन्या महाविद्यालय, इचलकरंजी

श्रमसंस्कृतीचा विचार करता शेतकरी व बलुतेदार हे एकमेकांवर अवलंबून असतात. शेतात राबणारा शेतकरी आणि बलुतेदार याचा घनिष्ठ संबध आहे. काळानुरूप श्रमसंस्कृती बदलताना दिसते. मात्र ग्रामीण मनाशी नाळ जोडला गेलेला शेतकरी आणि बलुतेदार हे ग्रामीण भागात महत्त्वाचे आहेत. याचे चित्रण अनेक ग्रामीण साहित्यकृतीतून झालेले दिसते. या ग्रामीण साहित्यकृतींपैकी ग्रामीण नाटकातून चित्रण झालेले शेतकरी व बलुतेदारांच्या श्रमसंस्कृतीचे चित्रण व्यंकटेश माडगूळकर यांच्या 'तू वेडा कुंभार' या ग्रामीण नाटकातून झाले आहे.

कारण, कुंभार हा खेड्यातील बारा बलुतेदारांपैकी एक असतो. तो गाडगी-मडकी तयार करून सर्व गावाला देत असतो आणि त्यातून मिळणाऱ्या उत्पन्नावर आपली उपजीविका करीत असतो. असा हा कुंभार म्हणजे इजाप्पा होय. कष्टाने मिळणाऱ्या भाकरीवर सुखासमाधानाने जगणाऱ्या या इजाप्पाला आधुनिक गोष्टींचा नेहमीच विरोध असतो. कारण गावात आधुनिक प्रगती होऊ लागली तर गावातील सुख-शांती नाहीशी होईल. बलुतेदारांची कामं बंद पडतील व त्यांना जगण्यासाठी कामधंदा मिळणार नाही, याची जाणीव होती. भोजा हा गावात येणाऱ्या एस.टी.त प्रवाशांना बसवण्याची दलाली करतो हे इजाप्पाला मान्य नाही. तो या गोष्टीला विरोध करतो. भोजाला जे कळत नसते ते या इजाप्पाला कळते. भोजा हा एकुलता एक मुलगा असल्याने व लहान असताना एकवेळा त्याला मारल्यावर वाईट अनुभव आल्याने इजाप्पा त्याला मारत नसतो. तो लाडाने वागणूक देत असतो. या गोष्टीची चीड वंचालाही येते. आपला सासरा पतीला काहीच बोलत नाही. यामुळे ती गुणवंत असूनही शांत असते. सासरा आपल्या संसारासाठी राबराब राबतोच याची तिला जाणीव असते. म्हाताऱ्या इजाप्पाला भोजाने चांगलं राहावं, काम करावं आणि संसार चांगला करावा एवढीच इच्छा असते, याबद्दल इजाप्पाचं मनात दुःख असते. भोजा मात्र ते कधीही समजावून घेण्याचा प्रयत्न करत नाही. इजाप्पा मोटार आपल्या दारात येऊ नये म्हणून मुलाला समजावून सांगत असतो, पण बोजा ऐकत नाही.

या प्रसंगी बाप-लेकाचा संघर्ष दिसतो. भोजाला मोटार महत्त्वाची वाटते. कारण त्याला कमिशन मिळत असते, तर इजाप्पाला बैल महत्त्वाचा वाटतो. कारण तो ईश्वराचे रूप आहे. ग्रामीण भागातील बाज इजाप्पाच्या बोलण्यात दिसतो. सखारामचा डोळा वंचावर असतो हे भोजाला समजत नाही. वंचा ही इजाप्पाची सून तर भोजाची पत्नी आहे. तिला चांगलं-वाईट कळतं. आपला नवरा वाईट मार्गाला जात आहे, हे समजून सुद्धा ती काही करू शकत नाही. याची तिला खंत असते. भोजा तिला भरल्या घरात रडू नये, म्हणताच ती हे घर गाडग्यांनी आणि खापऱ्यांनी भरलेलं आहे. घरात पोरं नाहीत, कशानं भरलंय हे घर असं म्हणते. ड्रायव्हरवाल्याचा तिरस्कार करणारी वंचा सासऱ्याच्या बाजूने आहे. त्यामुळे भोजाला राग येतो. पण तिला खूश करण्यासाठी सखारामने दिलेला चोळीचा खण भोजा

देतो. तेव्हा ती खण न घेता रागाने भोजाला–त्या ड्रायव्हरवाल्याला शिव्या देते.

ड्रायव्हरचा असा तिरस्कार करणारी पतिव्रता वंचा नंतर मात्र परिस्थितीने बदलते. भोजा दारात हॉटेल सुरू करतो. ती हॉटेलमध्ये पैसे घेण्यासाठी बसते. येथूनच तिच्यात बदल होतो. उंबऱ्याच्या आत राहणारी वंचा उंबऱ्याच्या बाहेर येते. कोणाचाही स्पर्श करून न घेणारी वंचा तिला पुरुषांच्या स्पर्शाची सवय होते. ती हळूहळू सखारामला भाळते. वंचाला सारा गाव नावजायचा पण आता तोच गाव उलटसुलट चर्चा करायला लागलेला. यामुळे इजाप्पा तिला चार गोष्टी समजावण्याचा प्रयत्न करतो. तेव्हा वंचाच म्हाताऱ्यावर रागावते आपल्या सासऱ्याचा आदर राखणारी वंचा कालानुरूप बदलताना दिसते. सखारामच्या जाळ्यात सापडते. त्याच्याशी लाडीगोडीने वागू लागते. आपल्या नवऱ्याच्याच वाटेने जाऊ लागते. जसा काळ बदलेल तशी वंचा बदलताना दिसते. सखाराम व भोजा दोघेही आनंदी आहेत. कारण सखाराम आपल्या चालीत यशस्वी झालेला आहे, तर भोजावर सखाराम खूश आहे असे भोजाला वाटते. या सर्व प्रकरणामुळे इजाप्पा नेहमीच तणावात वावरतो. आपल्या मुलाचा संसार चांगला व्हावा असे याला वाटते, पण काळानुरूप त्याचे स्वप्न मातीमोल होते.

हॉटेल सुरू झाल्याने सखारामचे येणे–जाणे वाढते. सखाराम वंचाशी सलगीने वागू लागतो. वंचाही विरोध करत नाही. हॉटेलमध्ये पाटलू, धोंडीराम येऊन बिलावरून भांडण काढतात. यावेळी भोजाला मारतात व हॉटेलची मोडतोड करतात. भोजा पोलिसांना आणण्यासाठी जातो. सखाराम मात्र वंचाशी अधिक जवळीक करून रात्री घरी येतो असे सांगून निघून जातो. इजाप्पाला हे सर्व असाह्य होते. सीतेसारखी राहणारी वंचा आता उंबऱ्याबाहेर आलेली यावरून इजाप्पाचे वंचाशी तू–मी होते. ती इजाप्पाला उलट बोलते. आपल्या कुटुंबाची वाताहत होत आहे हे दिसू लागते, पण तो काही करू शकत नाही. रात्री सखाराम घरी येतो. चहाच्या निमित्ताने तो आतील खोलीत जातो. हे इजाप्पाला पाहवत नाही. रागाने तो सखारामचा खून करतो. दरम्यान, भोजा येतो व तो उलट बापावरच रागावतो. सत्य काय आहे हे जाणून न घेता जेलमध्ये जा म्हणतो. आपल्या कर्माची फळं भोग असं बोलल्यानं इजाप्पा मनातून कोलमडून पडतो. पोलीस येतात व इजाप्पाला घेऊन जातात. या त्याच्या विधानातून मनातील भावना, दुःख प्रकट होते. आपल्या घराच आता वाटोळे होणार याची जाणीव झाल्यानेच तो सखारामला मारतो व जेलमध्ये जातो.

या नंतर गावात साखर कारखाना सुरू होतो. सर्व सोयी–सुविधा येतात. इजाप्पा १० वर्षे सजा भोगून आपल्या गावी येतो. पण तेथे त्याला त्याचं गाव सापडत नाही. एका घरासमोर लहान ६ वर्षाच्या मुलाला जवळ घेऊन चौकशी करतो. तेव्हा तो मुलगा त्याचा नातू असल्याचे समजते. भोजा व वंचा दोघेही लहान मुलाला पाळण्यात ठेवून साखर कारखान्यात कामाला गेलेली असतात. ते लहान बाळ रडताना या इजाप्पाचा जीव कासावीस होतो, पण यावेळीही त्याला काहीच करता येत नाही. साऱ्या गावाचा चेहरामोहरा बदलल्याने इजाप्पाला येथे राहावेसे वाटत नाही. म्हणून तो आपला गाव शोधण्यास जाण्याचा विचार करून त्या लहान मुलाच्या रडण्याचा आवाज बंद होताच त्या ६ वर्षाच्या मुलाला खांद्यावरून खाली उतरवतो.

नाटकाच्या सुरुवातीला इजाप्पाला जी मनात भीती होती ती सर्व गोष्टींच्या माध्यमातून सत्यात आलेली दिसते. त्यामुळे त्याच्या मनातील दुःख तो नातवाला बोलून दाखवितो, पण तो लहान असल्याने त्याला काहीच कळत नाही. हे गाव आपले नाही असं इजाप्पा शेवटी


ISSN No. 2319-6025

Scanned by CamScanner

म्हणतो व गाव सोडून जाऊ लागतो. तसा तो मुलगा त्याला जाऊ नका, जाऊ नका असे म्हणतो, पण म्हातारा ऐकत नाही आणि त्या मुलांचे बोल कारखान्याच्या भोंग्यामध्ये विरून जातात. घराच्या दारात याचा नातू खेळत असतो. मनातून त्याला आनंद होतो की भोजाला दोन मुलं आहेत. पण हे आपलं गाव आता आपलं नाही म्हणून मनातून दुःखी होतो व गाव सोडून जाताना नातवाला इजाप्पा म्हणतो,''जुन्या मोडक्या हत्यारावानी मी आता सांदीखोपड्याला पडीन. माजं काई ऱ्हायलं नाई. किती आशेनं आलो मी. शेवटाला मरायला माज्या गावात जाईन. माज्या घरात जाईन. माज्या मानसाची मांडी उशाला घीन. माज्या गावच्या वढ्याचं पानी तोंडात घीन आन् मरीन... पन माझं गावच मला घावना. घावलं ते दुसरंच गाव. माज ऱ्हाई. परकं दुसऱ्याचं, माजी मानसं मला भेटली ऱ्हाईत. बाळा, माजं आता भरलंय, माजं आता सरलंय, पर मी आता परक्या गावात कसा मरू? मरायाल माजं गाव बघायला पायजे, माजं घर बघितलं पायजे... (धडपडून उठतो) जातू मी... आठवन ठिवा आज्याची हा... ऱ्हायली तर... ठिवा म्हाताऱ्याची आठवण...''

या इजाप्पाच्या शेवटच्या संवादातून त्याच्या जीवनाची शोकांतिका स्पष्ट दिसते. आपल्या गावासाठी आणि मुलाच्या विकासासाठी धडपडणारा इजाप्पा शेवटी अस्थायी होतो. आयुष्यातून उठतो. अशी ही एक वेगळ्या पातळीवर संघर्ष करणारी वृद्ध व्यक्तिरेखा येते. या नाटकाचा शेवट शोकात्मक झाला आहे. इजाप्पाच्या विचारांचा येथे कोणीही विचार केलेला नाही. यामुळे ग्रामीण भागातील सुखी जीवन दुरावत आहे. आधुनिक जीवनपद्धती येते आहे. यातून ग्रामीणता नष्ट होत चालली आहे. भारतातील अनेक खेड्यांचे प्रातिनिधिक रूप म्हणून हे खेडे येते.

एकूणच येथे इजाप्पा रूढी-परंपरा सांभाळत जीवन जगत असतो, तर भोजा हा आधुनिकतेच्या पाठीमागे धावताना दिसतो. यातून बलुतेदारी नष्ट होऊन गावाचे गावपण कमी होताना दिसते. माया, ममता, प्रेम, जिव्हाळा या गावात राहात नाही हे येथे दिसते. तसेच येथे दोन पिढीतील संघर्ष दिसतो. इजाप्पा आणि भोजा यांचे विचार हे दोन विरुद्ध टोकाचे दिसतात. म्हणूनच शेवटी इजाप्पा आपलं घरदार सोडून बेघर होताना दिसतो. आपल्या मनामध्ये तो परिवर्तन न करता आपला पूर्वीचा गाव शोधू पाहतो. पण ते काळाने शक्य नाही याची जाणीव या इजाप्पाला नसते. शेवटी या नाटकातून हेच दिसून येते की, शेतकरी असो व बलुतेदार असो त्याचे श्रम हे असतातच. उदरनिर्वाह करण्यासाठी आणि भारतीय ग्रामीण संस्कृतीच्या जोपासनेचा एक भाग म्हणून श्रम करताना दिसतात. यातून व्यंकटेश माडगूळकर यांनी ही श्रमसंस्कृती ग्रामीण पातळीवर उत्कटपणे मांडून नाटकाचा शेवट क्रमशः सुखात्मक व शोकात्मक असा केलेला दिसतो. या ग्रामीण नाटकातून ग्रामीण भागातील श्रमसंस्कृती अभिव्यक्त होताना दिसते.

**संदर्भ**


१. माडगूळकर व्यंकटेश : तू वेडा कुंभार, प्रकाशक अ. अ. कुलकर्णी कॉन्टिनेन्टल प्रकाशन, विजयनगर, पुणे ३० प्रथमावृत्ती १९६१, तृतीयावृत्ती १९८६, पृ. ५७

२. यादव आनंद, ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि समस्या, प्रकाशन - अनिलकुमार मेहता, मेहता पब्लिशिंग हाऊस, १२१६, सदाशिव पेठ धनश्री अपार्टमेंट्स, पुणे ४११ ०३०, प्रथमावृत्ती, एप्रिल १९७९, द्वितीयावृत्ती १९८४


◆




ISSN No. 2319-6025



Scanned by CamScanner